# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः25.04.2024** **वारःगुरुवार**

---

1. लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस
2. व्हीव्हीपॅटच्या शंभर टक्के पडताळणीबाबतचा निर्णय सर्वोच्च न्यायालयानं राखून ठेवला.
3. छत्तीसगढमधील दंतेवाडा जिल्ह्यात 18 माओवाद्यांची पोलिसांसमोर शरणागती
4. हवामान बदलाच्या परिणामांपासून रक्षणासाठी वन संरक्षण महत्वाचं असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन आणि
5. दुबईत सुरू झालेल्या 20 वर्षांखालील वयोगटासाठीच्या आशियाई मैदानी अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या दीपांशु शर्माला भालाफेकीत सुवर्णपदक

**<u>उमेदवारीमुदत</u>**

लोकसभा निवडणुकीसाठीच्या चौथ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आज संपत आहे. उद्या उमेदवारी अर्जांची छाननी होणार असून सोमवारपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. या टप्प्यात 9 राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून 96 लोकसभा मतदारसंघांमध्ये 13 मे रोजी मतदान होणार आहे. यात महाराष्ट्रात पुण्यासह नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर, मावळ, शिरुर, अहमदनगर, शिर्डी आणि बीड मतदारसंघात मतदान होईल. बिहार, झारखंड, ओडिशा, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, तेलंगण आणि जम्मू काश्मीरमध्येही चौथ्या टप्प्यात मतदान होणार आहे.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातला प्रचार काल संपला. काल प्रचाराच्या शेवटच्या दिवशी राज्यात अनेक प्रमुख नेत्यांच्या प्रचारसभा झाल्या. या टप्प्यात 88 लोकसभेच्या जागांसाठी 13 राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये उद्या मतदान होणार आहे. मध्य प्रदेशमध्ये बैतुल मतदार संघामध्ये दुसऱ्या टप्यात होणारं मतदान बसप च्या उमेदवाराचा मृत्यू झाल्यामुळं तिसऱ्या टप्प्यात घेण्याचा निर्णय निवडणूक आयोगानं घेतला आहे. 13 राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातून एकंदर 1198 उमेदवारांमध्ये ही लढत होणार आहे.

विविध पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांनी काल आपल्या उमेदवारांच्या समर्थनार्थ शेवटचे शर्थीचे प्रयत्न करत मतदारांना पथफेऱ्या आणि प्रत्यक्ष भेटीच्या माध्यमातून आपल्या उमेदवाराला मतदान करण्याचं आवाहन केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी छत्तीसगढ मधील अंबिकापुर आणि मध्यप्रदेशातील सागर जिल्ह्यात सभा घेतल्या तर भाजपचे जेष्ठ नेते अमित शहा यांनी केरळ मधल्या अल्लपुळा मध्ये काल दुपारी सभेला संबोधित केलं. भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डा यांची काल बिहार मधील भागलपूर मध्ये सभा झाली तर कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी अमरावती जिल्ह्यात परतवाडा इथं पक्षाचे उमेदवार बळवंत वानखेडे यांच्या प्रचारासाठी सभा घेतली. कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी दिल्ली मधील प्रचार सभेला संबोधित केलं.

**<u>सर्वोच्च न्यायालय</u>**

मतदारांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे दिलेलं मत आणि त्यासंदर्भातली कागदी पावती म्हणजेच व्हीव्हीपॅट यांची शंभर टक्के पडताळणी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवरील निर्णय काल सर्वोच्च न्यायालयानं राखून ठेवला. न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपांकर दत्ता यांच्या खंडपीठानं निवडणूक आयोगाला इव्हीएम च्या कार्यपद्धतीबद्दल अनेक प्रश्न विचारले.

त्याला उत्तरं देताना आयोगानं मतदान यंत्रांमध्ये कुठल्याही टप्प्यावर हस्तक्षेप करणं अशक्य असल्याची पुन्हा एकदा हमी दिली. निवडणूक आयोगावर विश्वास व्यक्त करुन सध्याची निवडणूक प्रक्रिया आणखी सशक्त करण्यासाठी काही सुधारणा शक्य असल्यास आपण त्यात लक्ष घालू असं न्यायालयानं सांगितलं. दरम्यान, कागदी मतपत्रिकांच्या वापराची कल्पना न्यायालयानं पुन्हा फेटाळली.

**<u>लष्कर प्रमुख</u>**

भविष्यात आधुनिक,चपळ,अनुकूल,आणि तंत्रज्ञान सक्षम शक्ती तयार करून होणर्या संक्रमणांसाठी आपण वचनबद्ध असल्याचा लष्कर प्रमुख जनरल मनोज पांडे यांनी पुनरुच्चार केला. सर्व सेवांमधील भागधारक,उद्योग क्षेत्रातील भागीदार, संशोधन आणि विकास संस्था, आणि धोरण निर्मात्यांनी समन्वय साधावा यासाठी त्यांनी उपस्थित सर्वांना आवाहन केल.नवी दिल्ली इथं भारतीय लष्करान आयोजित केलेल्या चर्चासत्रात आणि प्रदर्शनात ते बोलत होते. तंत्रज्ञान अधिग्रहण आणि सैनिकांना सक्षम करणं हा या वर्षीच्या चर्चासत्राचा विषय होता. युद्धभूमीवर स्वावलंबित्व याशिवाय जटील तंत्रज्ञानामध्ये स्वयंपूर्णता प्रणाली विकसित करण्यावर त्यांनी जोर दिला. स्पर्धेचं नवीन धोरणात्मक क्षेत्र म्हणून जे तंत्रज्ञान उदयास आलं आहे त्यामुळे भौगोलिक आणि राजकीय महत्व  वाढणार असल्याचही जनरल पांडे म्हणाले.

**<u>छत्तीसगढ माओवादी समर्पण</u>**

छत्तीसगढ मधील दंतेवाडा जिल्ह्यात एक तुकडीचा कमांडर आणि 3 महिलांसहित 18 माओवाद्यांनी पोलिसांसमोर शरणागती पत्करली. लोन वारातु अभियानांतर्गत पोलीस उपमहानिरीक्षक काम्लोचन कश्यप आणि पोलीस अधीक्षक गौरव राय यांच्या समोर ही शरणागती पत्करली. या सर्व माओवाद्यांना पुनर्वसन योजनेंतर्गत छत्तीसगढ सरकार कडून प्रोत्साहनपर 25 हजार रुपये आणि इतर योजनांचे लाभ दिले जाणार असल्याच राय यांनी सांगितलं.

**<u>राष्ट्रपती दीक्षांत</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी हवामान बदलाचा विषय अतिशय गंभीर असून त्याच्या परिणामांपासून रक्षण करण्यासाठी भारतीय वनं संरक्षित करण्याच्या भूमिकेवर जोर दिला. त्या काल डेहराडून इथ भारतीय वन संशोधन महाविद्यालयाच्या वन सेवा प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांच्या दीक्षांत समारंभात बोलत होत्या. मनुष्य जाणीवपूर्वक वनांच्या महात्वाकडे दुर्लक्ष करण्याची चूक करत आहे, असंही त्या यावेळी म्हणाल्या. आपण मनुष्य पृथ्वी वरील या मौल्यवान साधन संपत्तीचे मालक नसून संरक्षक आहोत हे प्रत्येक मनुष्यानं लक्षात ठेवलं पाहिजे यावर त्यांनी जोर दिला.

**<u>आपत्ती व्यवस्थापन</u>**

आपत्तींना तोंड देण्यासाठी सक्षम पायाभूत सुविधांबाबतची आंतरराष्ट्रीय परिषद काल नवी दिल्लीत सुरू झाली. या परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी दूरस्थ पद्धतीनं सहभागी झाले होते. नेहमी आपत्तीमुळे किती आर्थिक नुकसान झालं याची मोजदाद होते मात्र आपत्तीमुळे व्यक्ती, कुटुंब आणि समाजाचं किती नुकसान झालं याचा आढावा घेऊनच आपत्तीच्या नुकसानीची गणना होऊ शकते. त्यामुळे आपत्तीचा सक्षमपणे सामना करू शकेल अशा पायाभूत सुविधा निर्मितीत गुंतवणूक करणं महत्त्वाचं आहे असं पंतप्रधान यावेळी म्हणाले. सध्याच्या काळात आपत्तींचे परिणाम त्या देशांच्या सीमेपलिकडेही होत आहेत. अशावेळी सगळ्या देशांनी मिळून लवचिक धोरण आखणं गरजेचं आहे असं आग्रही प्रतिपादन पंतप्रधानांनी केलं.

**<u>संरक्षण सचिव कझाकिस्तान</u>**

घाय सहकार्य संघटनेच्या सदस्य देशांच्या संरक्षण मंत्र्यांच्या कझाकस्तान इथं होणाऱ्या वार्षिक बैठकीत संरक्षण सचिव गिरीधर अरमाने भारतीय शिष्टमंडळाचं नेतृत्व करतील. आज होणाऱ्या या बैठकीत क्षेत्रिय संरक्षणविषयक मुद्द्यांबरोबरच संरक्षण क्षेत्रातल्या सहकार्याबाबत चर्चा होणार आहे. दरम्यान या भेटीत संरक्षण सचिव मित्र देशांच्या संरक्षण मंत्र्यांसोबत संरक्षण क्षेत्रातल्या द्विपक्षीय भागीदारीबाबतही चर्चा करणार आहेत.

**<u>US-AID पॅकेज</u>**

अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडन यांनी युक्रेन, इस्रायल आणि तैवानसाठी 95 अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या मदत योजनेवर स्वाक्षरी केली आहे. या योजनेवर काल स्वाक्षरी केल्यानंतर व्हाईट हाऊसमधून बोलताना अध्यक्ष बायडन म्हणाले की, हा अमेरिकेसाठी, युक्रेनसाठी चांगला दिवस आणि जागतिक शांततेसाठी चांगला दिवस आहे. अनेक महिन्यांच्या वाटाघाटी आणि वादविवादानंतर अमेरिकन सिनेटने मदत योजनेला मंजुरी दिल्यानंतर ते बोलत होते. एकंदर 95 अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या मदत पॅकेजमध्ये युक्रेनला सुमारे 61 अब्ज डॉलर्स, इस्राइलसाठी 26 अब्ज डॉलर आणि इंडो-पॅसिफिकसाठी 8 अब्ज डॉलर्सचा समावेश आहे. हिंद प्रशांत क्षेत्रातल्या युक्रेनसह इस्राइल आणि अमेरिकेच्या अन्य भागीदारांना लष्करी मदत देण्याच्या तरतूदीचाही या विधेयकात समावेश आहे.

**<u>टिकटॉक</u>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी टिकटॉक या मोबाइल ॲपवर बंदी घालणाऱ्या विधेयकाला मंजूरी दिली आहे. चीनमध्ये निर्मिती झालेल्या या ॲपची अमेरिकन कंपन्यांना विक्री करणं थांबवण्यासाठी तसंच बाजारातून हे ॲप काढून घेण्यासाठी बाइटडान्स या कंपनीला नऊ महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. मोबाइल वापरकर्त्यांची माहिती या ॲपद्वारे चीनी अधिकाऱ्यांना पुरवली जाऊ शकते याविषयीच्या चिंतेमुळे अमेरिकेनं हा कायदा केला आहे. दरम्यान हा कायदा असंवैधानिक असल्याचं म्हणत त्याला न्यायालयात आव्हान देणार असल्याचं टिकटॉक नं म्हटलं आहे.

**<u>केनिया</u>**

केनियामध्ये, सध्या आलेल्या पुरांमधील मृतांची संख्या 38 वर पोहोचली आहे, अधिकारी आणि केनिया रेड क्रॉसच्या म्हणण्यानुसार 110,000 हून अधिक लोक विस्थापित झाले आहेत. केनियामध्ये मार्चच्या मध्यापासून मुसळधार पावसाची नोंद झाली आहे परंतु गेल्या आठवड्यात मुसळधार पावसाचा जोर वाढला आहे, परिणामी मोठ्या प्रमाणात पूर आला आहे. केनियन रेडक्रॉसनं सांगितलं की मार्चपासून त्यांनी 188 हून अधिक ठिकाणी बचावकार्य केलं आहे. केनियाच्या हवामान खात्याने देशाच्या काही भागांमध्ये 'मुसळधार ते अति मुसळधार' पावसाचा इशारा दिला आहे.

**<u>आशियाई मैदानी स्पर्धा</u>**

दुबईत सुरू झालेल्या 20 वर्षांखालील वयोगटासाठीच्या आशियाई मैदानी अजिंक्यपद स्पर्धेत काल भारताच्या दीपांशु शर्मानं भालाफेकीत सुवर्णपदक पटकावलं. याच स्पर्धेत रोहन यादवनं रौप्यपदक मिळवलं. मुलांच्या 15 शे मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रियांशू यानं रौप्य पदक मिळवलं तर रितिक राठी यानं गोळाफेक प्रकारात रौप्य पदक पटकावलं. या स्पर्धेत 60 भारतीय खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. या स्पर्धेतले विजयी खेळाडू येत्या ऑगस्टमध्ये पेरू देशात होणाऱ्या जागतिक मैदानी अजिंक्यपद स्पर्धेसाठी पात्र ठरतील.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.